2017-18

संस्थेचे नांव प्राचार्य शिवराज महाविद्यालय, साहित्य, वाणिज्य आणि डी.एस.कदम विज्ञान, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.

सभा नंबर

# मिटींग नोटीस

संस्थेच्या समितीची सभा दि. 17/7/2017 सोम वार रोजी सकाळी/ दुपारी/सायंकाळी/रात्री 11.15 वाजता ठिकाणी खालील कामांचा विचार करण्याकरिता भरणार आहे.तरी कृपया सदर सभेस हजर रहावे अशी विनंती आहे.

## -: सभेपुढील कामे :-

१) मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) सन 2017-18 या शै वर्षात होणारे प्रवेश व

३) सोयीचे प्रवेश राखीव आरक्षणानुसार करणेबाबत...

४) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे

५) रोस्टर व शासन निर्णयानुसार भरणेबाबत

६) अनुशेष पद्धत चालु आहे काय? चालु वर्षात अनुशेष

७) रजिस्टर पूर्ण आहे काय?

८) सन 2017-18 या शै. वर्षातील शिष्यवृत्ती बाबत

९) मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या रिक्त राहिलेल्या

१०) जागा खुल्या प्रवर्गातुन भरण्यास मान्यता देणे बाबत

११) मा.अध्यक्षसो यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे

येणे प्रमाणे असे ता. 10/7/2017

[signature]

चिटणीस — सभापती

प्राचार्य शिवराज महाविद्यालय, साहित्य, वाणिज्य आणि डी.एस.कदम विज्ञान, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.

दिनांक 17/7/2017 रोजी होणाऱ्या मिटिंगची नोटीस पोहोचल्याच्या सह्या

| अ. नं. | सदस्याचे नांव | सही |
|---|---|---|
| 1) | प्राचार्य डॉ एस वाय कोतमिरे | [signature] |
| 2) | डॉ. डी आर खरके | |
| 3) | डॉ. ए वी कुंभार | [signature] |
| 4) | प्रा. एन बी एकिले | [signature] |
| 5) | श्री. एस आर शहापूरकर | [signature] |
| 6) | श्री. एन एस कांबळे. | [signature] |

SHIVRAJ COLLEGE OF ARTS, COMM. & D.S. KADAM SCIENCE COLLEGE, GADHINGLAJ — K.S.S.S.

# स्थायी समिती बैठक क्र. 1.

2017 - 18.

महाविद्यालयामध्ये स्थायी समितीची बैठक सोमवार दि. 17 जुलै 2017 रोजी सकाळी 11.15 वाजता मा. प्राचार्य डॉ. एस वाय कोतमिरे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनामध्ये बोलविण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

1) प्राचार्य डॉ. एस वाय कोतमिरे - अध्यक्ष
2) डॉ. डी आर खरडे - विभागप्रमुख
3) डॉ. ए बी कुंभार - अधिव्याख्याता
4) प्रा. एन बी लकिये - —"—
5) श्री. एस आर शहापूरकर - प्रबंधक
6) श्री. एन एस कोबके - प्र. कर्मचारी प्रतिनिधी.

बैठकीस आवश्यक कोरम पूर्ण झाल्याने सदर बैठकीस रितसर सुरवात करण्यात आली.

विषय क्र - 1 :- मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे बाबत ...

ठराव क्र - 1 :- मागील सभा दि. 7 मार्च 2017 च्या सभेचा इतिवृत्तांत श्री एस आर शहापूरकर यांनी सभेपुढे वाचून दाखविला. सदरचा इतिवृत्तांत योग्य व बरोबर असल्यामुळे तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

|| ठराव सर्वानुमते मंजूर ||

सूचक :- श्री. एस आर शहापूरकर.
अनुमोदक :- प्रा. एन बी लकिये.

विषय क्र - 2 :- सन 2017-18 या शै. वर्षात होणारे प्रवेश व सोबचे प्रवेश शासकीय आरक्षणानुसार करणेबाबत ....

ठराव क्र - 2 :- सन 2017-18 या शै. वर्षात प्रवेशा-बाबत महाविद्यालयाने प्रवेश कमिटी स्थापन केली

P.T.O

Page No.
Date : / /

असून सदरली कमिटी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांच्या राखीव आरक्षणानुसार प्रवेश घेण्याबाबत सूचना करत असते. त्यामुळे महाविद्यालयामध्ये कोणालाही प्रवेश नाकारला जात नाही अशी माहिती मा. प्राचार्यांनी दिली. सदरचा ठराव योग्य व बरोबर असल्यामुळे तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

॥ ठराव सर्वानुमते मंजूर ॥

सूचक :- डॉ. ए बी कुंभार
अनुमोदक :- प्रा. एन बी एकिले.

विषय क्र 3 :- शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे रोस्टर व शासननिर्णयानुसार भरणेबाबत ---

ठराव क्र - 3 :- महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे शासन व विद्यापीठ यांच्या नियमानुसार तसेच रोस्टर प्रमाणे भरावीत त्यामध्ये इंग्रजी, वनस्पतिशास्त्र, संगणकशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, अर्थशास्त्र, प्राणिशास्त्र या विषयांचे शिक्षक वयोमानानुसार रिक्त सेवानिवृत्त झालेले आहेत. तसेच पुढील सहा महिन्यात सेवानिवृत्त होणारा स्टाफ याचा विचार करून त्या विषयाचा बिंदू नामावली शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व मा.व.क पुणे यांचे कार्यालयाकडून तपासून घेऊन शासन नियमानुसार सदरली पदे भरावीत असे मत डॉ. डी आर खरके यांनी मांडले सदरचा ठराव योग्य व बरोबर असल्यामुळे तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

॥ ठराव सर्वानुमते मंजूर ॥
सूचक :- डॉ. डी आर खरके.
अनुमोदक :- डॉ. ए बी कुंभार.

S.S.S. ... NGLAJ ... ARTS COMM & SCIENCE COLLEGE

विषय क्र 4:- अनुशेष पध्दत चालु आहे काय ? चालु वर्षात अनुशेष रजिस्टर पूर्ण आहे काय ?

ठराव क्र 4:- महाविद्यालयामध्ये अनुशेष पध्दत चालु आहे. प्राध्यापकांचे अनुशेष रोष्टर पूर्ण आलेले आहे तसेच प्रशासकीय सेवकांचे रोष्टर अद्यावत करुन घेण्यासाठी विद्यापीठाकडून माहिती घेवून ते पूर्ण करुन घेत आहोत अशी माहिती मा.प्राचार्यांनी दिली. सदरचा ठराव योग्य व बरोबर असल्याने तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

|| ठराव सर्वानुमते मंजूर ||

सूचक :- डॉ. डी आर खरडे.

अनुमोदक :- श्री. एस आर शाहापूरकर.

विषय क्र. 5:- सन 2017-18 या शैक्षणिक वर्षातील शिष्यवृत्ती बाबत ...

ठराव क्र - 5:- सन 2017-18 या शैक्षणिक वर्षात समाजकल्याण विभागामार्फत महा - डीबी टी पोर्टल ही वेबसाईट नव्याने सुरू केलेली आहे. सदर वेबसाईटवर स्कॉलरशिप चे फॉर्म ऑनलाईन विद्यार्थ्यांनी भरावयाचे आहेत परंतू सदर वेबसाईट नवीन असल्याने विद्यार्थ्यांना अज्ञान व अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे अशी माहिती श्री. एन एस कांबळे यांनी दिली. यावर सदर महा- डी बी टी वेबसाईट चे अवलोकन विद्यार्थ्यांना व्हावे व सहज सुलभरित्या त्यांनी स्कॉलरशिप फॉर्म भरावेत यासाठी एक दिवसीय कार्यशाळा घ्यावी असे मत मा. प्राचार्यांनी मांडले सदरचा ठराव योग्य व बरोबर असल्यामुळे तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

|| ठराव सर्वानुमते मंजूर ||

सूचक :- श्री एन एस कांबळे.

अनुमोदक :- प्रा. एन बी एकिले.

Page No.
Date :

आयत्यावेळी येणारे विषय :-

विषय ६ :- मा. अध्यक्षांच्या यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे बाबत..

ठराव क्र. ६ :- ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करत असताना महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची हजेरी बाबत चर्चा करण्यात आली तसेच महाविद्यालयातील स्वच्छता करणे, बागबगीचा वाढवणे, इ विषयावर सखोल चर्चा झाली व चहापान कार्यक्रम झाल्यावर सभा संपल्याचे मा. प्राचार्यांनी जाहिर केले.

विषय 7 :- मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या रिक्त राहिलेल्या जागा खुल्या प्रवर्गातून भरण्यास मान्यता देणेबाबत --

ठराव क्र. 7 :- महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष 2017-18 च्या प्रवेश प्रक्रिया शासन व विद्यापीठाच्या आरक्षण धोरणानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देवून रिक्त जागा खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांमधून भराव्यात असे प्रबंधक शहापूरकर यांनी मत मांडले यावर सविस्तर चर्चा करण्यात आली व ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

॥ ठराव सर्वानुमते मंजुर ॥

सूचक :- श्री. एस आर शहापूरकर

अनुमोदक :- डॉ. डी आर खरके.

प्राचार्य
शिवराज महाविद्यालय,
साहित्य,वाणिज्य आणि डी.एस्.कदम
विज्ञान,गडहिंग्लज,जि.कोल्हापूर.

V.R.S.S.S. GADHINGLAJ ... E OF ARTS, COM... M SCIENCE COLLEGE